# मुंबईतील कॅम्पस जोडत धावणार मेट्रो-३!



- ३० शैक्षणिक संस्थांना जोडणार 'मेट्रो ३'
- २३ हजार कोटींच्या प्रकल्पाच्या कामाला पावसाळ्यानंतर होणार सुरुवात

**मुंबई : प्रतिनिधी**

देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईचा वेग आणखी वाढणार आहे. मुंबईकरांना त्यांच्या इच्छित स्थळी पोहोचवणाऱ्या मेट्रो ३ चे काम पावसाळ्यानंतर सुरू होणार आहे. कुलाबा ते सिप्झ अशा ३३.५ किलोमीटर लांबीच्या या प्रकल्पामुळे शहरातील महाविद्यालयांसह विविध ३० शैक्षणिक संस्था जोडल्या जाणार असल्याने विद्यार्थ्यांसाठी मेट्रो ३ सोईची ठरणार असल्याचा दावा मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशने केला आहे. २३ हजार १२७ कोटी रुपयांचा हा प्रकल्प असून या मार्गावर २७ स्टेशन्स असणार आहेत. विशेष म्हणजे यातील २६ स्टेशन ही भूमिगत असतील.

मेट्रो ३ मुळे कोणते फायदे होतील याचे सादरीकरण बुधवारी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशच्या (एमएमआरसीएल) व्यवस्थापकीय संचालिका आश्विनी भिडे यांनी केले. देशातील सर्वाधिक मोठ्या लांबीची ही मेट्रो जमिनीच्या २० ते ३० मीटर खालून धावणार आहे. जमिनीखालून मार्ग तयार करताना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी एमएमआरसीने या मार्गात येणाऱ्या सर्व इमारतींचे सर्वेक्षण केले आहे. बोगदा तयार करताना मोठे हादरे बसून इमारतींना धोका निर्माण होऊ नये यासाठी विशेष प्रकारच्या कमी हादरे बसणाऱ्या मशिन्स वापरल्या जाणार आहेत.

मेट्रो मार्गाच्या निर्मितीसाठी 'एमएमआरसीएल'ला ७८.६७ हेक्टर जमिनीची आश्यकता आहे. यातील ७५.२२ हेक्टर जमीन राज्य सरकारची, तर ३.४५ हेक्टर खासगी जमीन आहे. यापैकी ६४ हेक्टर जमीन संपादित करण्यात आली आहे. शिवाय ६६ जणांशी जमीन खरेदीबाबतचे करार केले आहेत. महालक्ष्मी रेसकोर्स, ओव्हल मैदान आणि आझाद मैदानचा काही भाग यापूर्वीच एमएमआरसीएलला मिळाला आहे. या मार्गात गिरगाव आणि काळबादेवी येथील २००० कुटुंबांचे पुनर्वसन

/...२